




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264

RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । २९/०३/२०२६ । पान - ६







# संगमनेरात 'भोंदू बाबा'चे वाढते प्रस्थ; वडगावची आख्यायिका राज्यभर

## विकृत घटनांनंतरही भक्तांचे उघडेना डोळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विज्ञान युगात जग झपाट्याने पुढे जात असताना संगमनेर शहर व तालुक्यात मात्र अंधश्रद्धेचे सावट अजूनही घट्ट असल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील काही दिवसांत नाशिकच्या भोंदू 'खरात बाबा'चे कथित गैरप्रकार, पारनेरमधील महाराजाचा वादग्रस्त प्रताप, वसईच्या महाराजाचा अत्याचार तसेच इतर ठिकाणच्या बुवांवर झालेल्या गंभीर आरोपांच्या घटना समोर आल्या आहेत. तरीदेखील लोकांच्या श्रद्धेचे डोळे उघडत नसल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी आसाराम बापू, गुरमीत राम रहीम सिंह, रामपाल यांसारख्या तथाकथित बाबांचे कारनामे देशाने पाहिले आहेत. न्यायालयीन कारवाई, तुरुंगवास आणि उघड झालेले गंभीर गुन्हे या सर्वांनंतरही समाजातील काही घटकांचा अशा भोंदू प्रवृत्तीवरील विश्वास कमी झालेला दिसत नाही. संगमनेरात देखील 'बुवांचे जाळे' मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. संगमनेर शहरातील विविध भागांसह तालुक्यातील वडगाव पान, गुंजाळवाडी, मांची आणि इतर ग्रामीण भागांत लहान-मोठे तांत्रिक, मांत्रिक, गंडेदोरे देणारे आणि भविष्य सांगणारे बुवांनी अक्षरशः बस्तान बसवले आहे. बाहेरून येणारे 'बंगाली बाबा'ही येथे मोठ्या प्रमाणात आपला प्रभाव निर्माण करत आहेत. तालुक्यातील वडगाव पान परिसरातील बाबाची आख्यायिका तर राज्यभर पसरली आहे. दारू सोडविणे, लग्न जुळवणे, संतानप्राप्ती, घरातील कलह, आरोग्य समस्या किंवा इतरांबद्दल असलेली समस्या अशा विविध कारणांनी लोक या भोंदू बाबांकडे धाव घेतात. विशेष म्हणजे, काही ठिकाणी दारू सोडविण्याचा दावा करणाऱ्या आश्रमांतील सेवकच व्यसनाधीन असल्याचे प्रकारही समोर आले आहेत.



### सोशल मीडियातून 'चमत्कारांची' विक्री

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, इंस्टाग्राम, व्हिडिओ प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या तथाकथित बाबांचे 'चमत्कार' मोठ्या प्रमाणात पसरवले जात आहेत. आकर्षक व्हिडिओ, भावनिक कथा आणि बनावट अनुभव यांच्या जोरावर लोकांना आकर्षित केले जाते. परिणामी अडचणीत सापडलेले किंवा मानसिकदृष्ट्या खचलेले लोक त्यांच्या जाळ्यात अडकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून नवनवीन बाबांची ओळख भक्तांना होऊ लागली असून त्यांच्या तथाकथित चमत्काराला नमस्कार करण्यासाठी लाचार भक्तांच्या रांगा लागत आहे.

**या बातमीनुसार वाचकांनी भोंदूबुवा बांबाची माहिती पाठवावी**

अंधश्रद्धेविरोधात लढा देणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या आहूतीनंतर महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू झाला. मात्र हा कायदा प्रभावीपणे राबवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांतील काही घटकही अशा भोंदू बाबांच्या प्रभावाखाली असल्याचे दिसत आहे. सध्याच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री व सर्वपक्षीय आमदार, खासदार खरात सारख्या भोंदूच्या नादी लागल्याचे दिसून आले. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी प्रश्नचिन्हात आहे. 'बाबा' बदलतात, पण फसवणूक कायम अशी परिस्थिती सर्वत्र पहायला मिळत आहे. एखादा बाबा गैरप्रकरणात, बलात्कारात अडकल्यानंतर त्याचे खरे स्वरूप समोर येते, तेव्हा काही काळ भक्तांमध्ये नाराजी निर्माण होते.

(पान ३ वर)

## नागरिकांना दैनिक युवावार्ताचे जाहीर आवाहन

संपूर्ण महाराष्ट्रात भ्रष्टाचार, लैंगिक शोषण आणि बुवाबाजीचे स्तोम उघड होत असताना अद्यापही अनेक ठिकाणी तथाकथित बाबांच्या आश्रमात अंध भक्तांच्या रांगा पाहायला मिळतात. महाराष्ट्रात अंधश्रद्धेविरुद्ध संपूर्ण आयुष्यभर लढा देणारे आणि हौतात्म्य पत्करणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे स्मरण जनतेने करावे. डॉ. नरेंद्र दाभोळकर कोणत्या धर्माच्या, जातीच्या विरोधी नव्हते. ते कुणाच्या श्रद्धेच्या विरोधी नव्हते तर ते अंधश्रद्धा आणि बुवाबाजीच्या विरोधात होते. त्यासाठी त्यांनी अनेक प्रकारचे प्रबोधन कार्यक्रम करून जनतेचे समुपदेशन केलेले आहे. तरीही धर्माच्या नावाखाली, अध्यात्माच्या नावाखाली, श्रद्धेच्या नावाखाली सामान्य जनतेला लुटणारे भोंदू, पोटभरू आणि तथाकथित महाराज यांना जनतेने भुलू नये. त्यांच्या चेहऱ्यावर न जाता स्वतःचे आत्मपरीक्षण करून सत्य काय आहे, योग्य काय आहे, गरजेचे काय आहे याचा विचार करून वास्तवाची, विज्ञानाची कास धरून आपले जीवन जगावे. जगात कोणतीही अशी जादू नाही की, कोणतीही विद्या नाही की मोठा चमत्कार घडू शकेल. परंतु तरीही काही पुराणाचे दाखले देऊन, धार्मिक स्थळांचे दाखले देऊन, धार्मिक ग्रंथांचे दाखले देऊन तथाकथित भोंदू बाबांनी आपली पोटभरू दुकाने उघडलेली आहेत. त्या दुकानाचे गिऱ्हाईक जनतेने होऊ नये. आपल्या विवेकाला स्मरून, विचार करावा की खरोखर आपलं संकट हा भोंदू दूर कसा करेल? आपल्या अडचणींवर पर्याय किंवा उपाय हा भोंदू देऊ शकला असता तर त्याला त्याचे दुकान चालवण्याची गरज काय? सामान्य जनतेचा श्रद्धाळूपणाचा गैरफायदा घेऊन कोट्यावधी रुपयांच्या मालमत्ता जमा करणारे आणि त्या संपत्तीचा माज म्हणून अनैतिक कृत्य करणारे जे भोंदू बुवा, बाबा, महाराज आणि अन्याय करणारे कोण आहे त्याचा शोध सरकारने घ्यावा, प्रशासनाने घ्यावा. श्रद्धावान जनतेने डोळे झाकून अशा बाबांच्या नादी लागू नये असे झाल्यास खरात सारखे भोंदू निर्माण होतात.

# संगमनेरात तिसऱ्या डोळ्याच्या निगराणीसाठी एक कोटी रूपयांचा निधी मंजूर - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहर आता तिसऱ्या डोळयाच्या निगराणीखाली येणार असून, शहराच्या सुरक्षेसाठी आणि गुन्हेंगारीवर वचक बसविण्यासाठी नगरपालिका हद्दीतील मुख्य चौक, सार्वजनिक ठिकाणं आणि संवदेनशिल भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.





जिल्ह्यातील सर्वच नगरपालिका हद्दीत सीसीटीव्ही बसवून सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देण्याची भूमिका पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. यापुर्वी अहिल्यानगर शहरांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याला सुरुवात झाली आहे. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून निधीची तरतुद करण्यात आली आहेत. संगमनेर शहरा करीता १ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाल्याने शहरवासियांना आता मोठा दिलासा मिळणार आहे.

शहरातील महत्वाची ठिकाणं, मुख्य रस्ते, उपनगरातील काही भाग, बाजारपेठ, गर्दीचे चौक आणि सरकारी कार्यालयांच्या परिसरात विशेषत्वाने सीसीटीव्हीची नजर आता असेल. त्यादृष्टीने त्याबाबतचे नियोजन करण्यात येणार असल्याचे आ.अमोल खताळ यांनी सांगितले. सर्व सीसीटीव्हींसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षही कार्यान्वित करण्यात येणार आहे. गुन्हेंगारीला आळा, चोऱ्या आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लघंन करणा-यांवर कडक नजर ठेवणे या सुविधेमुळे सोपे होणार आहे.

शहरातील नागरीकांची सुरक्षाही आमची प्राथमिकता असून, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी याकरीता १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्याने चांगली सुविधा निर्माण होईल. पोलिसांनाही तपास कार्यात या यंत्रणेची मोठी मदत होईल. संपूर्ण शहर सीसीटीव्हीच्या नजरेत आणल्यामुळे महिला व जेष्ठ नागरीकांना सुरक्षिततेची हमी मिळेल असा विश्वास आ.अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

शहरातील प्रभाग क्र.१३ मध्ये असलेल्या जेधे कॉलणीतील वाल्मिक मंदिराच्या रंग, फरशी, शेड, घोटाई व त्या अनुषंगिक कामांसाठी २० लाख रुपये तर शामबाबा मंदिराच्या फ्लोरींग दुरुस्ती व रंग कामाकरीता १० लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंजूर केला असल्याची माहीती आ.अमोल खताळ यांनी दिली.

# भोंदू खरातवर आणखी दोन गुन्हे दाखल

## आठ गुन्हे बलात्काराचे तर दोन गुन्हे आर्थिक फसवणुकीचे

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी जेलची हवा खाणाऱ्या भोंदू अशोक खरातवर शुक्रवारी रात्री उशिरा आणखी दोन गुन्हे दाखल करण्यात आलेत. यापैकी एक गुन्हा लैंगिक अत्याचाराचा, तर दुसरा आर्थिक फसवणुकीचा आहे. लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात खरातने पीडित महिलेवर आपल्या मोडस ऑपरेंडीनुसार म्हणजे आपण दैवी अवतार असल्याचे सांगत अत्याचार केला. ही महिला आपल्या नवऱ्यासोबत संसार सुखाचा व्हावा म्हणून खरातकडे आली होती. पण त्याने तिच्यावरच अत्याचार करून आपला कामवासना भागवली.



यासंबंधीच्या माहितीनुसार, प्रस्तुत प्रकरणात पती व पत्नीचे २०१३ साली लग्न झाले. पण त्यांच्यात सातत्याने खटके उडत होते. त्यामुळे ते विभक्त राहत होते. एका व्यक्तीच्या सूचनेनुसार ते आपला संसारगाडा रुळावर आणण्यासाठी भोंदू अशोक खरातकडे गेले होते. २०२२ साली हे दोघे पहिल्यांदा त्याच्याकडे गेले. त्यानंतर २०२४ मध्ये पुन्हा ते अशोक खरात याच्याकडे गेले. त्यावेळी खरातने पतीला केबिनबाहेर बसवले. त्यानंर पत्नीला तांब्याच्या भांड्यातून पाणी प्यायला देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच यावेळी त्याने तिला ठार मारण्याचीही धमकी दिली.

२८/०३, १२:५९/ाि डरपक्षरू -हळीश: तू ही गोष्ट कुणाला सांगितली तर मी महादेवाचा अवतार आहे. माझ्याकडे दैवी शक्ती आहे. मी तुझ्या मुलांना मारून टाकून तुझा संसार उद्धस्त करेन असे खरात म्हणाला होता, असे पीडित महिलेने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. तत्पूर्वी, हे दोघे २०२२ मध्ये पहिल्यांदा अशोक खरातकडे गेले होते, तेव्हा त्याने या दोघांना त्यांच्या लग्नाची तारीख विचारली होती. त्यांनी लग्नाची तारीख सांगितल्यानंतर तुमचे लग्न चुकीच्या तारखेला झाल्यामुळे तुमच्यात सातत्याने वाद झाल्याची बतावणी त्याने केली होती. त्यानंतर हे दोघे जवळपास ६-७ वेळा त्याच्याकडे गेले होते.

ऑगस्ट २०२४ मध्ये अशोक खरातच्या नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर येथील कार्यालयात गेले असता त्याने महिलेवर बलात्कार केला. महिलेने आपल्या तक्रारीत ऑगस्ट २०२४ ते डिसेंबर २०२४ पर्यंत या कालावधीत अशोक खरातने आपल्यावर ४ वेळा बळजबरीने गैरकृत्य केल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे अशोक खरातविरोधात आतापर्यंत सरकारवाडा पोलिस ठाण्यात एकूण १० गुन्हे दाखल झालेत. त्यातील २ आर्थिक फसवणुकीचे तर ८ महिला अत्याचाराचे आहेत.









# अखेर रुपाली चाकणकरांचा राजीनामा

मुंबई (वृत्तसंस्था)

अशोक खरात प्रकरणात अडचणीत आलेल्या रुपाली चाकणकरांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदानंतर आता राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला आहे. खरातला गुरू मानणाऱ्या रुपाली चाकणकरांवर महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा यासाठी दबाव होता. आता त्यांनी या पदाचा राजीनामा दिला आहे. या संपूर्ण प्रकरणात निष्पक्ष चौकशी व्हावी अशी आपली मागणी असल्याचं रुपाली चाकणकरांनी म्हटलं आहे.खरात प्रकरणी आपण आधीच भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात किंवा गैरकृत्यात आपला दुरान्वयेही संबंध नाही. पोलीस तपासात या गोष्टी समोर येतीलच. हा तपास पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे व्हावा अशी मागणी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालकांकडे केली आहे, असं रुपाली चाकणकरांनी म्हटलं आहे.



शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अशोक खरातवर कारवाई झाली. अशोक खरातसोबत रुपाली चाकणकरांचे काही फोटो व्हायरल झाल्यानंतर चाकणकरांवर टीका होऊ लागली. चाकणकर या अशोक खरातला गुरू मानायच्या, त्यामुळे या आधीच्या काही प्रकरणामध्ये चाकणकरांनी राजकीय हस्तक्षेप केल्याचं समोर आले होते.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# नगरमध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर हल्ला, सात पोलीस जखमी




अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- शासकीय कर्तव्य बजावत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकावर दगडफेक करून कामात अडथळा आणल्याची धक्कादायक घटना नगर-सोलापूर रोडवरील तुक्कड ओढा येथे २६ मार्च रोजी रात्री १० ते १०.३० वाजण्याच्या कालावधीत घडली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे नावे निष्पन्न झालेल्या ३१ जणांसह अन्य ७० जणांच्या जमावावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील ६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून इतरांचा शोध सुरु आहे. या घटनेबाबत पोलीस कॉन्स्टेबल सुनील रमेश मालणकर यांनी फिर्याद दिली आहे.

२६ मार्च रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक परिसरात गस्त घालत असताना आरोपी योगेश पंडित बेरड (वय ३४, रा. वाकोडी, ता. नगर) याने आपली मोटारसायकल आडवी लावून पोलिसांचे वाहन अडवले. त्यानंतर दिपक कुंडलिक बेरड (वय ४५), देविदास शिवाजी बेरड (४४), राजु पंडित बेरड (वय ४३), मयुर अशोक पुंड (वय ३६), धर्मा दत्तात्रय बेरड (वय ३०) यांच्या सह जमावाला बोलावून घेतले.

या जमावाने पोलिसांना घेराव घातला होता. जमावाने पोलिसांना अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि दगडफेक सुरू केली. या हल्ल्यात फिर्यादी सुनील मालणकर यांच्यासह स. पो. नि. हरीश भोये, पोलिस अंमलदार अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे आणि भगवान धुळे हे जखमी झाले असून शासकीय वाहनाचेही नुकसान झाले आहे.

# घारगाव पोलीस ठाण्यातील जप्त वाहने ताब्यात घ्या, अन्यथा लिलावाची कारवाई




संगमनेर (प्रतिनिधी) - तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्यात सन २०१० पासून गुन्ह्यात वापरलेली, चोरीची आणि तपासाच्या अनुषंगाने जप्त केलेली वाहने मूळ कागदपत्रे अथवा मालकी हक्काबाबत माहिती देवून घेवून जाण्याचे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की सन २०१० अर्थात घारगाव पोलीस ठाण्याच्या स्थापनेपासून गुन्ह्यात वापरलेली, चोरीची आणि तपासाच्या अनुषंगाने जप्त केलेली वाहने मूळ कागदपत्रे अथवा मालकी हक्काबाबत माहिती देवून योग्य त्या अटी व शर्तीवर मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

एमएच.१६, तरी एमएच.१७, क्यू. ८३९६, एमएच.१७, एएच. ८४८८, एमएच.१७, एन. ४९२०, एमएच.१९, एएफ. २०२५, एमएच.१७, डीएक्स. ७२८५, विना क्रमांकाची हिरो होंडा, एमएच.१७, एक्स. २१७५, एमएच.१२, डब्ल्यूवाय. ०१६४, डीआर. ३६०७, एमएच.१२, आरडी. ३७७३, एमएच.१७, सीडब्ल्यू. ०१८३, एमएच.१४, सीव्ही. ८९२३, महिंद्रा ट्रॅक्टर, विना क्रमांकाचा हॉलंड ट्रॅक्टर, एमएच.१२, ईई. ८५५५ ही वाहने पुढील पाच दिवसांत घेवून न गेल्यास सदर वाहनांचा सरकारी नियमाप्रमाणे लिलाव करणार असल्याचेही सहायक पोलीस निरीक्षक थोरात यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांनी उसाची एकरी उत्पादकता वाढवावी - माजी मंत्री बाळासाहेब थोरात




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- राज्यामध्ये अनेक कारखान्यांनी आपली गाळप क्षमता वाढवली आहे. सर्वत्र जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. अशा काळात आपल्या कारखान्याने कायम चांगला भाव दिला आहे. कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त ऊस लागवडी बरोबर एकरी उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. एकरी उत्पादन वाढीमध्ये हुमणी अळीसारखे अनेक अडचणी आहेत. हुमणी अळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कॉम्बो ट्रॅप चा वापर प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून विषमुक्त शेती गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर भारतीय कृषी संशोधन परिषद व ऊस संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हुमणी आळी नियंत्रणासाठी कॉम्बो ट्रॅप चा वापर याबाबतचे एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लखनऊ येथील भारतीय ऊस संशोधन संस्थेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ज्ञानेश्वर बोरसे, शास्त्रज्ञ डॉ. योगेश थोरात, चेअरमन पांडुरंग पा. घुले, संचालक रामनाथ कुटे, विजय राहणे, विनोद हासे, विलास शिंदे, अरुण वाकचौरे, नवनाथ आरगडे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, भास्कर बागुल, माणिकराव यादव, किरण रोहम, सेक्रेटरी किरण कानवडे, कृष्णा दिघे, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे, ऊस विकास अधिकारी बाळासाहेब सोनवणे, प्रा. जी. बी. बाचकर यांच्यासह विविध अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी भारतीय ऊस संशोधन संस्थेच्या वतीने तालुक्यातील अनुसूचित जाती जमाती मधील शेतकऱ्यांना कॉम्बो ट्रॅपच्या किटचे वितरण करण्यात आले. याचबरोबर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते दोन्ही संस्थांच्या संयुक्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी मंत्री थोरात म्हणाले की, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय कृषी संशोधन केंद्राची स्थापना केली आहे. विविध विद्यापीठ मधून होणारे संशोधन या संस्थेमध्ये जातात. त्या माध्यमातून नवनवीन संशोधन शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होते. ऊस व दूध हे शाश्वत उत्पादन देणारे आहे. थोरात कारखाना व दूध संघाने कायम चांगला भाव दिला आहे. निळवंडेच्या पाण्यामुळे ऊस क्षेत्र वाढणार आहे. शेतकऱ्यांनी उसाचे एकरी उत्पादन वाढवले पाहिजे. याकरता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा. या ऊस उत्पादकता वाढीमध्ये हुमणी आळी यासारखे मोठे अडथळे आहेत. विविध फवारणीमुळे मित्र कीड मारली जाते. मात्र हुमणी आळी जमिनीखाली राहते. म्हणून कॉम्बो ट्रॅप मुळे हुमणी आळी यंत्रणात येण्यासाठी मोठी मदत होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर बोरसे यांनी तर व्हा. चेअरमन पांडुरंग घुले यांनी आभार मानले.

# श्री खंडोबा यात्रेनिमित्त सावरगाव घुलेत बैलगाडा शर्यतींचा महोत्सव

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- तालुक्यातील सावरगाव घुले येथे स्वयंभू श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री खंडोबा महाराजांचा यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, यानिमित्त २ ते ४ एप्रिल दरम्यान भव्य बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना अनुभवायला मिळणार आहे. यात्रेची सुरुवात गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सकाळी ७ महापूजा व अभिषेकाने होणार असून, सकाळी ८ वाजता मांडव डहाळे मिरवणूक, सायंकाळी ६ वाजता महाआरती, सायंकाळी ७.३० वाजता भव्य पालखी मिरवणूक छबिना आणि रात्री १० वाजता ढोलकी सम्राज्ञी शिवकन्या बडे यांचा लोकनाट्य तमाशाचा आनंद रसिकांना घेता येणार आहे.

शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता महाआरती, त्यानंतर सकाळी १० वाजता तमाशा हजेरी कार्यक्रम आणि सकाळी ११ वाजता भव्य बैलगाडा शर्यतींना सुरुवात होणार आहे. यासाठी प्रथम क्रमांकाचे ४१ हजार रुपयांचे बक्षीस अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्यावतीने दिले जाणार आहे. त्याचबरोबर ३१ हजार रुपयांचे बक्षीस संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या वतीने, तर २१ हजार रुपयांचे तिसरे बक्षीस एन. एस. यु. आय. चे संगमनेर तालुका अध्यक्ष गौरव डोंगरे यांच्या वतीने दिले जाणार आहे. हा बक्षीस वितरण कार्यक्रम याच दिवशी अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे आणि संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या शुभहस्ते आणि प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पाडणार आहे. याशिवाय घाटाचा राजा, फळी फोड आकर्षक ट्रॉफी सह इतरही आकर्षक बक्षिसे विजेत्या गाड्यावाल्यांना देण्यात येणार आहेत. या महोत्सवासाठी बैलगाडा शर्यतीचे टोकन शुल्क ५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, मोठ्या संख्येने शर्यतपटू सहभागी होण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.


श्री खंडोबा देवस्थान

शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले असून, सायंकाळी ६ वाजता पालखी छबिना व तळी भंडार कार्यक्रमाने यात्रेची सांगता होईल. यात्रा नियोजन समिती, श्री खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्ट, कोरठण पायी पालखी सोहळा मंडळ, विविध मित्रमंडळे, महिला मंडळ व समस्त ग्रामस्थ सावरगाव घुले यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच घारगाव पोलीस स्टेशनचे विशेष सहकार्य लाभत आहे. या यात्रेसाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संगमनेरात भोंदू बाबाचे...

पान नं. ०१ वरुन -

मात्र, त्यानंतर तेच भक्त दुसऱ्या बाबाच्या मागे लागतात आणि पुन्हा त्याच चक्रात अडकतात. ही साखळी थांबण्याचे नाव घेत नाही. महिलांचे आयुष्य उध्वस्त होते. अशा अनेक प्रकरणांत महिलांवर अत्याचार, आर्थिक फसवणूक आणि कुटुंबांचे उध्वस्त होणे यांसारखे गंभीर परिणाम दिसून आले आहेत. तरीही समाजात अपेक्षित जागृती होताना दिसत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या समस्यांचे समाधान बहुतांश वेळा त्याच्याकडेच असते. मात्र, आत्मविश्वासाच्या अभावामुळे लोक बाह्य आधार शोधतात आणि त्यातून अशा भोंदू प्रवृत्तींचा उदय होतो. आज राज्यासह संगमनेरात निर्माण झालेली ही परिस्थिती केवळ स्थानिक समस्या नसून सामाजिक चिंतेचा विषय आहे. विज्ञान आणि शिक्षणाच्या युगातही जर अंधश्रद्धा इतक्या खोलवर रुजत असेल, तर समाज नेमका कोणत्या दिशेने जात आहे, हा प्रश्न गंभीर आहे.

# डॉ. सोमनाथ गिते यांना ‘महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार’ प्रदान

मुंबई (युवावार्ता प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दिला जाणारा सन २०२१-२२ या वर्षाचा मानाचा ‘राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार’ डॉ. सोमनाथ वेणूताई निवृत्ती गिते यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित दिमाखदार समारंभात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्यास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, कीर्तनकार सत्यपाल महाराज यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



व्यसनमुक्ती चळवळीत डॉ. गिते यांनी केलेल्या उल्लेखनीय व प्रभावी कार्याची दखल घेत हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला. समाजजागृती, मार्गदर्शन आणि जनप्रबोधनाच्या माध्यमातून त्यांनी अनेकांना व्यसनाच्या अंधःकारातून बाहेर काढत नवजीवन दिले आहे. पुरस्कारामध्ये रोख रक्कम, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ यांचा समावेश आहे.

डॉ. गिते यांचे कार्य राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही गौरवले गेले असून इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, युनिक वर्ल्ड रेकॉर्ड्स, लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये त्यांच्या कार्याची नोंद झाली आहे. यापूर्वीही त्यांना व्यसनमुक्ती गौरव पुरस्कार, समाजरत्न पुरस्कार, सेवादूत पुरस्कार आणि राष्ट्रीय युवा आयकॉन पुरस्कार अशा विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. गिते म्हणाले, व्यसनामुळे उद्धस्त होत असलेली अनेक कुटुंबे जवळून पाहिली आणि त्यांच्या वेदना अनुभवल्या. त्यातूनच समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्धार झाला. अनेक वर्षांच्या कार्यातून व्यसनाधीन व्यक्तींना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला, हीच माझी खरी कमाई आहे. हा पुरस्कार माझ्यासोबत व्यसनावर मात करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. तसेच, या पुरस्काराची संपूर्ण रक्कम आणि स्वतःकडून तितकीच भर घालून स्वर्गीय आई वेणूताई यांच्या स्मरणार्थ शाळेसाठी देणगी देत असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यांच्या या यशाबद्दल राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पॉलिटेक्निक इंजिनिअरिंग काळाची गरज !

## दहावीनंतर काय ?

दहावीनंतर काय? असा अनेक मुलांसमोर मोठा प्रश्न उभा असतो. दहावी नंतर कमी वेळेत व कमी खर्चात पूर्ण होणारा कोर्स म्हटलं तर पॉलिटेक्निक हा एक चांगला पर्याय आहे. कमी वेळेत स्वतःच्या पायावर उभे रहायचे असेल तर पॉलिटेक्निक हा एक चांगला पर्याय आहे. कमी वेळेत स्वतःच्या पायावर उभे रहायचे असेल तसेच तांत्रिक क्षेत्रात करिअर करायचे असेल तर पॉलिटेक्निक उत्तम पर्याय विद्यार्थ्यांसमोर होऊ शकतो.

पॉलिटेक्निक शिक्षणामुळे लवकर नोकरीची संधी मिळण्याची शक्यता अधिक असते. तसेच पुढील शिक्षणासाठी अभियांत्रिकी पदवीच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. स्वतःची आवड, कौशल्ये व पुढील संधी लक्षात घेऊन योग्य शाखेची निवड करता येते. पॉलिटेक्निक हा तीन वर्षाचा कोर्स आहे, कोर्स पूर्ण करून लगेचच नोकरीची संधी आहे. तसेच पुढील अभियांत्रिकी पदवीत एक वर्षाची सूट मिळते. पदवीका आणि पदवीला सहा वर्ष लागतात. पॉलिटेक्निक अभ्यासक्रमात तांत्रिक कौशल्यावर भर असतो. त्यामुळे विदयार्थ्यांना थेट उद्योग, कारखान्यामध्ये काम करण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळते. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कुशल तंत्रज्ञान असणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी वाढत आहे. पॉलिटेक्निक आर्थिक दृष्ट्या गरीब असणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी खर्चिक आहे.

**दहावी पुर्ण केल्यानंतर तीन वर्षात पॉलिटेक्निक इंजिनिअरिंग अभ्यासक्रम आपणास नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध करून देतो. पॉलिटेक्निकच्या विविध शाखामधून आपणास उद्योजक होण्यास मदत होते. तसेच संगणकाशी निगडित असणाऱ्या एआयएमएल, डेटा सायन्स, एआयडीएस सारख्या शाखानमधून रोजगार निर्मितीच्या संधी खुप आहेत. त्यामुळेच पॉलिटेक्निक इंजिनिअरींग आता काळाची गरज बनले आहे.**



**- प्रो. वाय. एस. सातपुते**
**प्राचार्य, अजिंक्य इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राहुरी**
**मो. ८२८२८२५८१८**



## रोजगाराच्या संधी काय ?

पॉलिटेक्निक शिक्षण पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरीची उत्तम संधी उपलब्ध आहेत. पॉलिटेक्निक पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणक, बांधकाम, इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल क्षेत्रात लगेचच नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, संगणक व बांधकाम क्षेत्रात स्वतःची कंपनी स्थापन करणे शक्य होते.

**इलेक्ट्रॉनिक्स** व दुरसंचार अभियांत्रिकी - संधी - मोबाईल नेटवर्किंग, दुरसंचार उद्योग, उपकरण उद्योग व उत्पादन. नोकरी - दुरसंचार कंपन्या, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन उद्योग.

**सिव्हिल अभियांत्रिकी** –संधी - बांधकाम क्षेत्र, स्ट्रॅक्चरलं डिजाईन, पायाभूत सुविधा प्रकल्प. नोकरी - रेल्वे, सार्वजनिक बांधकाम, खाजगी कंपन्या, तसेच स्वतःचे लायसन्स मिळाल्यानंतर सरकारी कामे घेऊ शकतात.

**संगणक अभियांत्रिकी** - संधी - सायबर क्राईम, सॉफ्टवेअर हार्डवेअर, वेब डेव्हलपमेंट नेटवर्किंग. नोकरी - डेटा सेंटर, माहिती तंत्रज्ञान, स्टार्टअप.

**इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी** – संधी - इलेक्ट्रिकल वाहन, विजनिर्मिती, विजवितरण, घरगुती आणि औद्योगिक उपकरण, सुपरवायजर अभियंता. नोकरी - इलेक्ट्रिक वाहन, विजकंपन्या, वीज प्रकल्प, तसेच स्वतःचे लायसन्स मिळाल्यानंतर सरकारी कामे घेऊ शकतात.

**यांत्रिकी अभियांत्रिकी** – संधी - डिझाईन, ऑटोमोबाईल कंपन्या. नोकरी - वाहन कंपन्या, उत्पादन क्षेत्र, संशोधन व विकास विभाग.

**माहिती तंत्रज्ञान (आय. टी.)** - संधी - डेटा विश्लेषण, क्लाउड, सॉफ्टवेअर विकास. नोकरी - माहिती व तंत्रज्ञान विभाग, स्टार्टअप, बँका व सरकारी संस्था.

## संपादकीय...

जयंतीनिमित्त

# मराठी साहित्याचा सशक्त आवाज डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठी साहित्यविश्वात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांचे योगदान केवळ लेखनापुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण साहित्यपरंपरेला नवा विचार, नवी दिशा आणि सशक्त बौद्धिक आधार देतात. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. साहित्यिक, विचारवंत, समीक्षक, शिक्षक आणि प्रशासक या सर्व भूमिका त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध, विचारप्रधान आणि व्यापक झाली. २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावात जन्मलेले डॉ. कोत्तापल्ले ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे आले. साध्या वातावरणात शिक्षण घेत असताना त्यांनी असामान्य प्रतिभेचे दर्शन घडवले. देगलूर येथून बी. ए. पदवी घेताना त्यांनी मराठवाड्यात तिसरा आणि मराठी विषयात प्रथम क्रमांक मिळवला, ही त्यांची बौद्धिक गुणवत्ता दर्शवणारी बाब आहे. त्यानंतर त्यांनी मराठवाडा विद्यापीठातून एम. ए. पूर्ण करून १९८१ साली पी. एच. डी. पदवी संपादन केली. शंकरराव पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास हा त्यांचा संशोधन विषय होता, जो त्यांच्या समीक्षात्मक दृष्टिकोनाची साक्ष देतो. डॉ. कोत्तापल्ले यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये विचारशीलता, साहित्यप्रेम आणि सामाजिक भान निर्माण केले. पुढे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले आणि नंतर पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख झाले. २००५ ते २०१० या कालावधीत त्यांनी कुलगुरू म्हणून कार्य करताना शैक्षणिक क्षेत्रातही आपली वेगळी छाप निर्माण केली. लेखनाच्या क्षेत्रात त्यांनी १९७० पासून सक्रिय योगदान दिले. त्यांचा 'मूड्स' हा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'कर्फ्यु आणि इतर कथा', 'संदर्भ' हे कथासंग्रह, 'गांधरीचे डोळे' आणि 'मध्यरात्र' या कादंबऱ्या, तसेच 'कवीच्या गोष्टी' आणि 'सावित्रीच्या लेकी' या दीर्घ कथा विशेष गाजल्या. त्यांच्या साहित्यामध्ये ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव, मानवी नातेसंबंध आणि मानसिक गुंतागुंत यांचे अत्यंत प्रभावी चित्रण आढळते. डॉ. कोत्तापल्ले यांचे एक मोठे योगदान म्हणजे त्यांचे समीक्षात्मक लेखन. 'साहित्याचा अन्वयार्थ', 'आधुनिक मराठी कविता', 'नव कथाकार शंकर पाटील', 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध' हे त्यांचे ग्रंथ मराठी साहित्यातील महत्त्वाचे संदर्भग्रंथ मानले जातात. त्यांनी साहित्याचा केवळ आस्वाद घेतला नाही, तर त्याचे तात्त्विक विश्लेषण करून वाचकांना नवा दृष्टिकोन दिला. त्यांच्या लेखनात विचारांची सुस्पष्टता, भाषेची सहजता आणि आशयाची खोली दिसून येते. साहित्यिक म्हणूनच नव्हे, तर प्रशासकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी. बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा विविध संस्थांमध्ये त्यांनी अध्यक्ष म्हणून काम केले. या पदांवर काम करताना त्यांनी मराठी भाषेच्या विकासासाठी आणि गुणवत्तापूर्ण साहित्य निर्मितीसाठी धोरणात्मक निर्णय घेतले. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी साहित्यविश्वाला मार्गदर्शन केले. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी साहित्याच्या सामाजिक जबाबदारीवर भर दिला. साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नसून ते समाजपरिवर्तनाचे साधन आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. कोत्तापल्ले यांच्या लेखनाची एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची सामाजिक जाणीव. त्यांनी ग्रामीण समाज, वंचित घटक आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून त्याचे प्रतिबिंब आपल्या साहित्यामध्ये उमटवले. त्यांच्या लेखनात वास्तववाद आणि संवेदनशीलता यांचा सुंदर संगम आढळतो. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली. त्यांच्या जाण्याने केवळ एक साहित्यिक हरपला नाही, तर एक विचारवंत, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपले. त्यांच्या लेखनातून आणि कार्यातून पुढील पिढ्यांना दिशा मिळत राहील, यात शंका नाही. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करताना त्यांच्या कार्याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

# सर डी. एम. पेटिट विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात एक्स्टर्नल ऑडिट उत्साहात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचे सर डी. एम. पेटिट विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे २०२५-२६ या वर्षाचे आय. एस. ओ. - ९००१ : २०१५ एक्स्टर्नल ऑडिट, ऑडिटर संजय गिम्हवनेकर यांच्या उपस्थित झाले. यावेळी संजय गिम्हवनेकर यांचे पेटिट विद्यालयाच्या लेझीम पथकाने उस्फूर्त असे स्वागत केले. तर प्राचार्य राजेंद्र चौधरी यांनी त्यांचा सत्कार केला.



ऑडिटर संजय गिम्हावनेकर यांनी विद्यालयाचे सर्व कामकाज व नियोजनाच्या फाईल्स पाहिल्या. ऑफिस, ग्रंथालय, प्रॅक्टिकल्स, लॅब, टाचण वही, अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन, परीक्षा फाईल, सांस्कृतिक विभाग, टाचण वही, शिक्षकांचे पाठ निरीक्षण, स्वच्छता, शिक्षक पालक संघ रजिस्टर, विद्यार्थी हालचाल रजिस्टर, शिक्षक हालचाल रजिस्टर, शिस्त व शालेय व्यवस्थापन इत्यादी विभागाचे कामकाज सविस्तर बघून समाधान व्यक्त केले. आय. एस. ओ. चे काम पाहणारे विद्यालयाचे एम. आर. प्रकाश वनम यांनी नियोजन केले.

याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र चौधरी यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक शामसुंदर ब्राह्मणे यांनी समारोप प्रसंगी आभार मानले. या वेळी लिपिक भरत काठे, भाऊसाहेब मांढरे, संतोष धुळे, ज्युनिअर कॉलेजचे इन्चार्ज दशरथ गभाले आदीसह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# केळुंगण येथे रामनवमी निमित्ताने वह्यांचे वाटप



राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

प्रभु रामचंद्राच्या दंडक आरण्यामध्ये महर्षी अगस्ती, वृषी महर्षी वाल्मिक, धार्मिक व सत्यशिल राजा हरिचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भुमिमध्ये, प्रभुरामचंद्राच्या पदस्पर्शाने तसेच अदिशक्ती मुळ माता भवानी, केळुंगण येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने दरवर्षी प्रमाणे केळुंगण येथे वृध्दश्रामावर अ‍ॅड. मनोहरराव देशमुख यांचे दानशूर मधून पहीली ते दहावी पर्यतंच्या मुलांना वह्या वाटप केले.

तसेच हनुमंतराया आणि पांडुरंगाच्या कृपेने अखंड हरिनाम सप्ताह रामजन्म उत्सवाचे आयोजन केले गेले.

अ‍ॅड. मनोहरराव देशमुख यांच्या सहकार्याने ह. भ. प. वैकुंठवासी जयवंत डगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री रामजन्म सोहळ्याचे आयोजन केले. या वेळी आकोले तालुक्याचे आ. डॉ. किरण लहामटे, जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनिता ताई भांगरे, कार्यकारी अभियंता किरण देशमुख, अ‍ॅड. दत्ता निगळे, केळुंगचे सरपंच युवराज देशमुख, माजी सरपंच रामचंद्र भांगरे, सरपंच हिरामण देशमुख, ऊपसरपंच देशमुख, शंकराव देशमुख, अजय घोटकर हे उपस्थित होते.

त्यावेळी नायर हॉस्पिटलचे माजी डिन भारमल, कॉलेजचे प्राचार्य डॉ. बि. वाय. देशमुख, केळुंगण शाळेचे मुख्याध्यापक ऊकुर्डे तसेच, केळुंगणचे ग्रामस्ध व केळुंगण, कोहंडी, माळेगाव, कातळापुर, राजूर येथील विद्यार्थ्यी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार रखमा देशमुख यांनी मांडले.


**पाहिजेत**

माझे नाव लग्नाआधी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर **पार्वती राजाराम मंडलिक** असे होते. लग्नानंतर सर्व कागदपत्रावर **प्रमिला रामनाथ अभंग** असे आहे. तरी या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे.

**प्रमिला रामनाथ अभंग**
रा. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
JAVED IQBAL ABDULMAJID SHAIKH
TO NEW NAME AS
JAVED IQBAL
Address - Kuran Road, Hamja Nagar, Sangamner, PO: Sangamner, DIST: Ahmadnagar, Maharashtra - 422605

**पाहिजेत**

सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**पाहिजेत**

सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**बंगला भाड्याने पाहिजे**

2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

**SMBT DENTAL COLLEGE & HOSPITAL**

Ghulewadi (Amrutnagar), Tal. Sangamner, Dist. Ahmednagar- 422608 (02425) 225434 Fax No. (02425) 222867
smbt.trust@gmail.com | smbttrust@smbt.edu.in www.smbt.edu.in

Recognized by DCI, New Delhi & Affiliated to MUHS, Nashik

**WANTED**

Applications are invited, in the prescribed format, from the eligible candidates for the following post.

**Dean / Professor / Reader / Lecturer / Tutor**

Requisite Qualification, Experience, other details and prescribed application format are available on College website https://smbt.edu.in

Last date of Application : 8th April 2026

Enquiry Contact : 777440 04834

PRINCIPAL

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४ | डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५२८/२०२६ संगमनेर, दिनांक - २४/०३/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. गोरक्षनाथ भागाजी घुगे, रा. खळी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २३/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. खळी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आजी नामे तोलाबाई तुकाराम घुगे यांचा मृत्यू मौजे खळी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १०/१२/१९९५ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी खळी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी खळी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/४५६/२०२५ संगमनेर, दिनांक - २४/१२/२०२५

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शहेनाज युसुफ बेग रा. संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०८/१२/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे शहेनाज युसुफ बेग यांचा जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०६/०२/१९७४ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी
नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. अॅसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे**
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला, गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079




MALPANI

अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# रुपया विक्रमी नीचांकी पातळीवर



मुंबई (प्रतिनिधी)-

भारतीय रुपया आज २७ मार्च (शुक्रवार) रोजी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९४.७ च्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. मध्यपूर्वेत सुरू असलेले युद्ध आणि ऊर्जा पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारतीय रुपयामध्ये ही घसरण नोंदवली गेली.

गेल्या एका महिन्यातच रुपया सुमारे ४% घसरला आहे, तर या आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये त्यात १०% पेक्षा जास्त घसरण झाली आहे. तज्ज्ञांचे मत आहे की, जर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये वाढ सुरू राहिली, तर रुपया लवकरच ९८ च्या पातळीला स्पर्श करू शकतो. चलन बाजारातील जाणकारांनुसार, मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाने गुंतवणूकदारांना घाबरवले आहे, त्यामुळे ते उदयोन्मुख बाजारातून पैसे काढून सुरक्षित गुंतवणुकीकडे (जसे की डॉलर आणि सोने) वळत आहेत.भारताचे आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्चपर्यंत असते. सध्याच्या आकडेवारीनुसार, एका दशकाहून अधिक काळानंतर असे पहिल्यांदाच घडले आहे, जेव्हा रुपया एकाच वर्षात इतका जास्त घसरला आहे. यापूर्वी २०११-१२ या वर्षात युरोझोन संकटादरम्यान रुपयात सुमारे १४% घट झाली होती. ३१ मार्च २०२५ पासून आतापर्यंत रुपया त्याच्या मूल्यावरून १०% पर्यंत घसरला आहे.

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाला गेल्या अनेक दशकांतील सर्वात गंभीर ऊर्जा संकट मानले जात आहे. याचा थेट परिणाम भारतावर होत आहे. कच्च्या तेलाचे दर वाढल्याने भारताचे आयात बिल वाढले आहे. एलपीजीपासून प्लास्टिक आणि इतर पेट्रोकेमिकल उत्पादनांचा पुरवठा प्रभावित झाला आहे. डॉलर महाग झाल्यामुळे भारतात पेट्रोल-डिझेल आणि आयात केलेल्या वस्तू महाग होतील, ज्यामुळे किरकोळ महागाई वाढण्याचा धोका आहे. विश्लेषकांनी भारताच्या जीडीपी वाढीच्या अंदाजात कपात करण्यास सुरुवात केली आहे. बर्नस्टीनच्या एका अहवालानुसार, जर युद्ध लांबले, तर भारताच्या चालू खात्यातील शिल्लक (करंट अकाउंट बॅलन्स) वर दबाव वाढेल आणि रुपया या वर्षी ९८ प्रति डॉलरच्या पातळीला ओलांडू शकतो. काही विश्लेषकांनी पुढील १२ महिन्यांत महागाई नियंत्रणात आणण्यासाठी आरबीआयद्वारे व्याजदरात वाढ होण्याची शक्यताही वर्तवली आहे.

# ईपीएस-९५ पेन्शन प्रश्न तातडीने सोडवावा

## – राष्ट्रीय संघर्ष समितीचे निवेदन

अहिल्यानगर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

ईपीएस-९५ अंतर्गत पेन्शनधारकांच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावावा, या मागणीसाठी ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समिती, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने मा. श्रम व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांना भविष्य निर्वाह निधी कार्यालयामार्फत निवेदन सादर करण्यात आले. संसदेच्या अंदाजपत्रकीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दि. ९ ते ११ मार्चदरम्यान जंतर मंतर, नवी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर शांततामय आंदोलन छेडण्यात आले होते. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांनी केले. देशातील २७ राज्यांतील हजारो पेन्शनधारकांनी



यात सहभाग घेतला.

या आंदोलनाला विविध पक्षांच्या खासदारांनी उपस्थिती दर्शवली. यामध्ये शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंग, भाजपच्या राज्यसभेच्या खासदार मेधाताई कुलकर्णी, तसेच निलेश लंके, भास्करराव भगरे यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता. सर्वांनी पेन्शन हा हक्क आहे, मेहरबानी नव्हे अशी भूमिका मांडत सरकारने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. आंदोलनादरम्यान केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संघटनेच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावले होते. तसेच यापूर्वीही श्रममंत्री मनसुख मांडविया यांच्याशी चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, अद्याप ठोस निर्णय न झाल्याने पेन्शनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सध्या पेन्शनधारकांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत दयनीय असल्याचे समितीने नमूद केले आहे. ना घरचा ना घाटचा अशी अवस्था निर्माण झाली असून, सरकारने चालू अधिवेशन संपण्यापूर्वीच निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. समितीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत : किमान ७५०० रुपये पेन्शन व महागाई भत्ता लागू करावा, पेन्शनधारक दांपत्यांना मोफत आरोग्य सुविधा द्याव्यात, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पात्रांना उच्च पेन्शनचा लाभ द्यावा, योजनाबाह्य राहिलेल्यांना किमान ५००० रुपये सामाजिक सुरक्षा पेन्शन द्यावी. पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर यांनी दिल्लीतील आंदोलनाचा आढावा घेत लवकरच प्रश्न सुटेल, असा आशावाद व्यक्त केला. तसेच पुढील महिन्यात मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष संपत समिंदर, प्रतापराव निकम, विनायक लोळगे, भगवंत वाळके, अशोकराव देशमुख, साहेबराव वाघ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# गॅस संकटात उद्योगांना दिलासा

## एलपीजी कोटा ७०% पर्यंत वाढविला



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने देशात सुरू असलेल्या गॅस संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यांना पुन्हा एकदा एलपीजी पुरवठा वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने शुक्रवार (२७ मार्च) रोजी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे वाटप म्हणजेच कोटा ५०% वरून ७०% पर्यंत वाढवला आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फायदा पूर्णपणे एलपीजीवर अवलंबून असलेल्या उद्योगांना होईल. सरकारने स्पष्ट केले आहे की, स्टील, ऑटोमोबाइल, टेक्सटाइल आणि केमिकल यांसारख्या अधिक कामगार असलेल्या क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे भारतात एलपीजीची पुरवठा साखळी प्रभावित झाली होती. यावर मात करण्यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून याची माहिती दिली.मंत्रालयाने व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी पुरवठा वाढवण्यासाठी हा आदेश जारी केला आहे. यापूर्वी हा कोटा केवळ ५०% होता, जो आता वाढवून पूर्व-संकट पातळीच्या ७०% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

सरकारच्या आदेशानुसार, त्या उद्योगांना आधी एलपीजी दिला जाईल जिथे कामगार म्हणजेच मजुरांची संख्या जास्त आहे आणि जे इतर आवश्यक उद्योगांना समर्थन देतात.६ क्षेत्रांना प्राधान्य मिळेल

सरकारच्या आदेशानुसार, त्या उद्योगांना आधी एलपीजी दिला जाईल जिथे कामगार म्हणजेच मजुरांची संख्या जास्त आहे आणि जे इतर आवश्यक उद्योगांना समर्थन देतात. सरकारने या वाढीव कोट्यासह एक अट देखील ठेवली आहे.

# दोन लाखांची लाच, प्रांताधिकारी ताब्यात



पुणे

(युवावार्ता प्रतिनिधी)-

पुणे जिल्ह्यातील जुन्नर-आंबेगाव विभागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली. महसूल विभागाचे जुन्नर आंबेगावचे प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांना त्यांच्या कार्यालयातच दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. इमारतीच्या बांधकाम पूर्णत्व दाखल्यासाठी तक्रारदाराने प्रांताधिकारी कार्यालयात अर्ज केला होता. यासाठी शिंदे यांनी २ लाखांची लाच मागितली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने शुक्रवारी मंचर येथील प्रांत कार्यालयात सापळा रचला. तक्रारदाराकडून रक्कम स्वीकारताना प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांना ताब्यात घेतले. मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. या कारवाईने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार हे बांधकाम व्यवसायिक असून ते एका भागीदारी फर्मचे एक भागीदार आहेत. नमूद बांधकाम फर्मने इमारत बांधण्यासाठीच्या लागणाऱ्या सर्व शासकीय विभागाच्या परवानग्या ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचे, इमारत पूर्ण झाल्यावर पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे तसेच त्यासाठी लागणारे सर्व प्रकारचे शासकीय शुल्क भरणा करण्याचे सर्व अधिकार तक्रारदार यांना दिलेले आहेत. सदर भागीदारी फर्मने पुणे-नाशिक महामार्ग लगत नारायणगाव येथे जॉइंट व्हेंचर मध्ये विकासासाठी घेतलेल्या प्लॉटवर इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. सदर इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराने अंशतः पूर्णत्वाचा दाखला मिळण्याकरता उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर तो प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांनी नगर रचना विभागाकडे पाठवून त्यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून स्वतःकडे प्रस्ताव राखून ठेवला होता.

२० मार्च २०२६ रोजी सदर प्रस्तावाबाबत तक्रारदार हे चौकशी करण्यासाठी गेले असता उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांनी तक्रारदाराने बांधलेल्या इमारतीसाठी अंशतः पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्याकरिता तक्रारदाराकडे पाच लाख रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी २४ मार्च रोजी अँटी करप्शन ब्युरो पुणे येथे दिली होती. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २७ मार्च रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणीदरम्यान नमूद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे अर्जाप्रमाणे त्यांनी बांधलेल्या इमारतीस अंशतः पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मंजुर करून त्या मोबदल्यात तक्रारदाराकडे २ लाख रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.


पडताळणी कारवाई झाल्यानंतर २७ मार्च रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे गोविंद पंढरीनाथ शिंदे, उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव यांना उपविभागीय कार्यालय मंचर या त्यांच्या शासकीय कार्यालयात तीन वाजून तीन वाजता तक्रारदार यांचेकडून २ लाख रुपये लाच रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहात पकडण्यात आले. आरोपी लोकसेवक यांच्याविरुद्ध मंचर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण पोलीस येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# पदव्यांची खिरापत व बेरोजगारीचा शाप...

भारतातील पदवीधर आणि बेरोजगारी हा नेहमीच चर्चेचा विषय ठरलेला आहे. सामाजिक शास्त्रे ते शिक्षणशास्त्र यातील तथाकथित तज्ञ सर्वेक्षण करून या संदर्भात अधून मधून अहवाल सादर करतात. भारतातील प्रसार माध्यमे या अहवालांमधून फार मोठे वास्तव वा सत्य बाहेर आले आहे, अशा आविर्भावात त्यांना प्रसिद्धी देतात. खरे तर भारतातील पदवीधर व त्यांची बेरोजगारी या संदर्भात सरकारी धोरणांकडे अजिबात लक्ष जाणार नाही, अशा बोटचेपी पद्धतीने हे अहवाल सादर केलेले असतात. पदवीधर व उपलब्ध रोजगार यांच्यातील प्रचंड व्यस्त प्रमाणावर नेहमीचे साळसूद उपचार दिले जातात, ज्यांचा वास्तवाशी काडीमात्र संबंध नाही. त्यामध्ये भारताकडे जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या आहे, याची भलामण देखील कायम केली जाते.

शिक्षण रोजगाराभिमुख असावे, हा तर आता एक फंडाच झाला आहे. त्यामुळे कला, वाणिज्य व विज्ञान अशा पारंपारिक उच्च शिक्षणातील शाखांनाही जखडून टाकले आहे. पूर्वी पारंपारिक शाखेतील उच्च शिक्षणात मराठी साहित्य, हिंदी साहित्य, इंग्रजी साहित्य यांचे अध्ययन केले जात होते. आता ते कमी होऊन या भाषासंदर्भातील व्यावसायिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. यातील अनेक अभ्यासक्रम अत्यंत हास्यास्पद व कालबाह्य आहेत. शुद्धलेखन अथवा भाषांतर यांना व्यावसायिक किंवा रोजगारनिर्मिती करणारे अभ्यासक्रम म्हटले, तर आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगात याला महत्त्व राहिले आहे का, असा प्रश्न कोणालाही पडत नाही. शुद्धलेखन व भाषांतर या दोन्ही गोष्टी आज एआय च्या माध्यमातून सहज शक्य होत आहेत. एवढेच काय, एआय अर्ज, पत्र, ई-मेल, संदेश तुम्हाला हवा तसा, हव्या त्या भाषेत तयार करून देतो. उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमांमध्ये मात्र पत्रलेखन, अर्जलेखन हे प्रकार सुरू आहेत.

आपल्याकडे 'खूप पदवीधर झाले' अशी ओरड सुरू असते. कोणत्याही उच्च शिक्षणाच्या शाखेतील हे पदवीधर खरोखर पदवीधर बनवण्याच्या योग्यतेचे व क्षमतेचे आहेत का, या संदर्भातही सखोल चिंतन व परीक्षण होणे गरजेचे आहे. देशात उच्च शिक्षणाच्या नावाखाली किंवा पदव्यांच्या नावाखाली जी खिरापत वाटणे चालू आहे, त्याचा गांभीर्याने विचार करायला कोणीही तयार नाही. कला, विज्ञान व वाणिज्य या पारंपारिक शाखेतील महाविद्यालयांचा एक नमुना येथे सादर करतो. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य अधिक चांगल्या पद्धतीने लक्षात येऊ शकेल. मी राहतो त्या तालुक्यामध्ये, तालुक्याच्या ठिकाणी दोन जुने अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये आहेत. त्याच्या जोडीला गेल्या वीस वर्षांत आणखी आठ विनाअनुदानित महाविद्यालये तालुक्यातील खेड्यापाड्यात मंजूर करण्यात आली आहेत. अशावेळी दोन जुन्या व समृद्ध अनुदानित महाविद्यालयांसमोर विद्यार्थी संख्येचा प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण खेड्यातील विनाअनुदानित महाविद्यालयात




प्रवेश ते पदवी हे सर्वार्थाने सुलभ व सुगम आहे. अशा परिस्थितीत दोन अनुदानित महाविद्यालयांनी गुणवत्तेचे निकष लावले, तर त्यांचे दुकान बंद होण्याची शक्यता आहे, कारण आठ पर्यायी विनाअनुदानित दुकाने उघडण्यात आलेली आहेत, जेथे गुणवत्तेवर प्रवेशच दिला जात नाही. अशा ठिकाणी शिक्षणाची गुणवत्ता टिकवली जाईल, असा विचार करणे म्हणजे दिवा स्वप्न पाहण्यासारखे आहे.

आपल्याकडे शिक्षणाचा हक्क ही संकल्पना अत्यंत ढिसाळपणाने घेण्यात आलेली आहे. जगातील विकसित देशांमध्ये मुलगा असो की मुलगी, यांना बारावीपर्यंतचे शिक्षण संपूर्णपणे मोफत आहे. परंतु पदवीचे शिक्षण ते विद्यार्थी, त्यांच्यात गुणवत्ता असेल तरच घेऊ शकतात. त्यामुळे तिथे पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणासाठी जाणाऱ्यांची संख्या मोजकी असते आणि खरोखर ते विद्यार्थी गुणवत्ताधारक असतात. आपल्या देशात आजच्या घडीला केवळ कला, वाणिज्य व विज्ञान अशा पारंपारिक शाखाच नव्हे, तर मेडिकल, पॅरामेडिकल, फार्मसी, इंजिनिअरिंग, लॉ, शिक्षणशास्त्र इत्यादी प्रत्येक शाखेतील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची अवस्था अशीच झालेली आहे. आज प्रत्येक शाखेमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी कमी आणि महाविद्यालये व प्रवेश क्षमता अधिक, असे व्यस्त प्रमाण आपल्याला पाहायला मिळते. आर्थिक सुबत्ता असणारा कोणताही विद्यार्थी आज एमबीबीएस सारखे शिक्षण सहजपणे मिळवू शकतो. अशावेळी इतर शाखांचा विचार न केलेलाच बरा. यासाठी दहावी व बारावीला सगळे विद्यार्थी उत्तीर्ण होतील, अशी व्यवस्था देखील निर्माण करण्यात आलेली आहे, कारण ते उत्तीर्ण झाले नाहीत, तर ही विविध प्रकारची दुकाने चालणार नाहीत. त्यामुळे खरोखर गुणवत्ताधारक पदवीधरांना देखील विनाकारणच्या स्पर्धेला सामोरे जावे लागते आणि त्यांच्या संधी देखील हुकतात. दुसऱ्या बाजूला या सर्व व्यवस्थेमधून शेतीपासून ते उद्योगापर्यंत चतुर्थ श्रेणी काम करणाऱ्यांची टंचाई निर्माण झाली आहे. शेती असो की उद्योगधंदे, यांना या मनुष्यबळाची प्रचंड कमतरता भासत आहे, कारण गुणवत्ता नसलेलाही पदवीधारक झालेला आहे.

सर्व प्रकारच्या आरक्षणाचे काटेकोर पालन करत, प्रत्येक शाखेमध्ये गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश आणि पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. आपल्यासारख्या देशात आरक्षण असलेच पाहिजे, याचा मात्र मी कट्टर पुरस्कार करतो. प्रत्येक समाज घटकातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना मोफत अथवा अत्यल्प शुल्कात गुणवत्ता पूर्ण उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. आपल्या देशासारख्या समाज व्यवस्थेत आरक्षणाशिवाय ते शक्य नाही. येथे आरक्षण बंद करा आणि आरक्षण वाले म्हणजे गुणवत्ताहीन अशी विकृत मानसिकता असलेल्यांना एक तर अक्कल नाही किंवा जातीय अहंकारामुळे ते असे बोलतात. हजारो वर्ष शिक्षणाचे उच्च शिक्षण एका समाज घटकाला शंभर टक्के आरक्षण होते, तरी आपण गुलाम ते गुलामच राहीलो. यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही. खुला प्रवर्ग असो की आरक्षित, यामध्ये गुणवत्तेचा आग्रह धरल्यास कचरा आपोआप कमी होईल, उच्च शिक्षण हे कमी खर्चिक करता येईल आणि सुमारांवर होणारा विनाकारण खर्च टाळून हा पैसा महाविद्यालयांमध्ये उच्च दर्जाच्या शैक्षणिक सोयी-सुविधा पुरवण्यासाठी वापरता येईल. यातून देश विकसित होण्यासाठी आवश्यक असणारे, खरोखर उच्च गुणवत्ताधारक पदवीधर तयार होतील आणि इतर क्षेत्रातील चतुर्थ श्रेणी कामगारांचा प्रश्न देखील सोडवला जाईल. याचाच अर्थ, देशातील मनुष्यबळाचा सुयोग्य वापर सुयोग्य ठिकाणी करता येईल.

– प्रा. डॉ. राहुल हांडे, संगमनेर
मो. ८३०८१५५०८६

# आयपीएल १९ व्या हंगामाला सुरुवात



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आयपीएलच्या १९व्या हंगामाची सुरुवात आजपासून होणार आहे. पहिला सामना गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाईल. सामना बंगळूरुच्या घरच्या मैदानावर, एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल. तर नाणेफेक ७:०० वाजता होईल.

बंगळूरुने मागील हंगामात पंजाब किंग्जला हरवून आपले पहिले विजेतेपद पटकावले होते. तर, हैदराबाद प्लेऑफसाठी पात्र ठरू शकली नव्हती. संघ सहाव्या स्थानावर राहिला होता. आरसीबी आणि एसआरएच यांच्यात आतापर्यंत २५ सामने खेळले गेले आहेत. यापैकी १३ सामने हैदराबादने जिंकले, तर ११ सामन्यांमध्ये बंगळूरुला विजय मिळाला. एक सामना बरोबरीत सुटला होता, जो एसआरअच ने सुपर ओव्हरमध्ये जिंकला होता. एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये दोन्ही संघ ८ वेळा आमनेसामने आले आहेत. यापैकी ५ वेळा आरसीबी ने, तर ३ वेळा एसआरएच ने विजय मिळवला आहे.बंगळूरुचा संघ फलंदाजी, गोलंदाजी आणि अष्टपैलू अशा तिन्ही विभागांमध्ये संतुलित आहे. फलंदाजीमध्ये विराट कोहली आणि फिल सॉल्टसारखे उत्कृष्ट सलामीवीर आहेत. तर, देवदत्त पडिक्कलसाठी देशांतर्गत हंगाम उत्कृष्ट राहिला आहे. पडिक्कल किंवा व्यंकटेश अय्यर यावेळी तिसऱ्या क्रमांकावर खेळताना दिसू शकतात. मिडल ऑर्डरमध्ये टिम डेव्हिड आणि जितेश शर्मा यांनीही खझङ २०२५ मध्ये त्यांच्या आक्रमक फलंदाजीने खूप प्रभावित केले होते. त्याचबरोबर, रोमारियो शेफर्ड आणि कृणाल पांड्याकडून या हंगामातही संघाला दमदार कामगिरीची अपेक्षा असेल. वेंकटेश अय्यरच्या आगमनाने संघाची फलंदाजी आता आणखी संतुलित दिसत आहे. जोश हेजलवुडच्या अनुपस्थितीत भुवनेश्वर कुमार, रसिक सलाम आणि जेकब डफी महत्त्वाचे गोलंदाज असतील.

# 'धुरंधर 2'मुळे विवेक सिन्हा चर्चेत



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

धुरंधर २: द रिवेंज चित्रपट सध्या देशातच नाही तर जगभरात धुमाकूळ घालतोय. सिनेमातील सर्वच स्टारकास्टवर कौतुकाचा वर्षाव होतो. सिनेमात अनेक छोटे-मोठे सेलिब्रिटी झळकले आहेत. अनेकांनी अगदी छोटीशी भूमिकाही दमदारपणे साकारली आहे. पण, अलिकडेच सोशल मीडियावर धुरंधर : द रिवेंज सिनेमात विवेक सिन्हानी 'धुरंधर २'मध्ये जहूर मिस्त्रीची भूमिका साकारत प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. त्याच्या अभिनयाची केवळ भारतातच नाही, तर पाकिस्तानमध्येही चर्चा सुरू आहे. त्याला तिथून अनेक मेसेजेस येत असून काही जण त्याच्या अभिनयाचं कौतुक करत आहेत, तर काही जण टीकाही करत आहेत.

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर २'ने दमदार कथा, उत्कृष्ट अभिनय आणि भक्कम कास्टिंगच्या जोरावर जगभरात आपला ठसा उमटवला आहे. या चित्रपटातील प्रत्येक कलाकार आपल्या भूमिकेमुळे चर्चेत आहे. त्यापैकीच एक म्हणजे विवेक सिन्हा. त्याने साकारलेली जहूर मिस्त्रीची भूमिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. एका मुलाखतीत विवेकनी सांगितलं की, भारतातून त्याला खूप प्रेम मिळालं, पण त्याचबरोबर पाकिस्तानमधूनही मोठ्या प्रमाणावर मेसेज येत आहेत.

काहींनी त्याच्या अभिनयाचं खूप कौतुक केलं, तर काही जणांनी त्याला धमकीचे मेसेजही पाठवले. विवेक म्हणाला, काही लोक इतके भडकले होते की त्यांनी मला पाकिस्तानात येऊन मारून टाकू, असंही लिहिलं. त्यावर मी त्यांना सांगितलं की, मी पाकिस्तानी नाही, मी भारतीय आहे आणि बिजनौरचा आहे.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........ 05
सेल्सगर्ल........ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेर तालुक्यात ५८ हजार शेतकऱ्यांना नमो किसान योजनेचा आठवा हप्ता जमा

## आ. अमोल खताळ यांची माहिती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातील महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या नमो किसान सन्मान योजनेच्या आठव्या हप्त्याचे अनुदान संगमनेर तालुक्यातील ५८ हजार ४८६ शेतकऱ्यांना मंजूर झाले असून अनूदानापोटी ११ कोटी ६९ लाख रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग झाले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतक-यांसाठी महायुती सरकारने सुरु केलेली नमो किसान सन्मान योजना ही एक ऐतिहासिक योजना ठरलीआहे. केंद्र सरकारचे शेतकरी सन्मान योजनेचे वर्षाला ६ हजार रुपये आणि राज्य सरकारच्या नमो किसान सन्मान योजनेचे ६ हजार रुपये असे एकूण १२ हजार रूपयांचे अनुदान शेतकर्यां च्या थेट बॅक खात्यात वर्ग होत असल्याने दोन्ही योजनांचा मोठा दिलासा शेतक-यांना मिळत आहे संकटाच्या काळात महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून विविध योजना तसेच नैसर्गिक संकटात शेतऱ्यांना या सरकारने मदत उपलब्ध करून दिली असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

# दूध भेसळ प्रकरणी १५ आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळला

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दूधभेसळखोरांचे अनेक कारनामे उघड झाले आहेत. पोलिसांकडून अटक होताच आरोपींनी न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनाची मागणी केली होती.मात्र श्रीगोंदा सत्र न्यायालयाने १५ आरोपींचा जामीन फेटाळला आहे. त्यामुळे भेसळखोरांवर अटकेची टांगती तलवार असून, अटकेच्या भीतीने हे आरोपी पसार झाले आहेत. त्यांचा स्थानिक गुन्हे शाखेच्या स्थकाकडून तपास करण्यात येत आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे छापा टाकत लाखो रुपयांचे कृत्रिम दूध पकडले. कृत्रिम दुधाची विक्री करताना अफताब कलीम शेख, रामदास नवनाथ उबाळे, समीर कमीरुद्दीन शेख अशा तिघा आरोपींना रंगेहाथ पकडले. त्यांनी जामिनासाठी अर्ज केले होते. त्यांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. पोलिसांनी दूधभेसळीची पाळेमुळे 'खोदून काढली. या प्रकरणात आणखी ३१ भेसळखोरांची नावे समोर आली. दुधात भेसळ केल्याचे बिंग फुटताच यांपैकी १२ जणांनी बचावासाठी न्यायालयात धाव घेतली. वकिलामार्फत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केले. या अर्जावर श्रीगोंदा सत्र न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने दूधभेसळीतील एकाही आरोपीला जामीन देण्यास नकार दिला. एकाच वेळी १५ आरोपींचे जामीन अर्ज फेटाळल्याने भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे

तपासात निष्पन्न झालेल्या ३१ पैकी दोघ्रा आरोपींना गुरुवारी पोलिसांनी अटक केली आहे. त्यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या पाच झाली असून, उर्वरित २९ आरोपी फरार आहेत. आरोपी समीर शेख दूधभेसळीतील म्होरक्या आहे. तो राहुरी तालुक्यातील आहे. मशीनच्या साहाय्याने तयार केले कृत्रिम दूध बनवल्यानंतर त्याची अहिल्यानगरसह शेजारच्या नाशिक जिल्ह्यात विक्री होत होती. यातून शेख याच्यासह त्याच्या साथीदारांना मोठा नफाही मिळत होता. विशेष म्हणजे तो कृत्रिम दुधाची मोठ्या कॅनमधून वाहतूक करत होता. त्याच्याविरोधात यापूर्वीचे दूधभेसळीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

# निमगाव जाळीच्या उपसरपंचपदी वैभव वदक

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी वैभव भाऊसाहेब वदक यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

निमगाव जाळी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच प्रतिभा जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवडीसाठी बैठक पार पडली. उपसरपंचपदासाठी वैभव वदक यांच्या नावाची सूचना ज्ञानेश्वर डेंगळे यांनी मांडली, त्यास ग्रामपंचायत सदस्य दिलीप डेगळे यांनी अनुमोदन दिले. उपसरपंचपदासाठी एकमेव अर्ज असल्याने सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाचे सेवानिवृत्त सचिन शिवाजीराव जोंधळे, प्रवरा बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, माजी सरपंच अमोल जोंधळे, ठकाजी थेटे, रंगनाथ वदक, श्रीरामदूत पतसंस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब डेंगळे, दिलीप डेंगळे, ज्ञानेश्वर डेंगळे, साक्षी जोंधळे, तानाजी डेंगळे, कमल थेटे, संगीता तलोळे, पुष्पा डेंगळे, सीमा तलोळे, मंदा आरगडे, भास्कर खरात, उषा पवार, नितीन जोंधळे, रामकृष्ण लंगोटे, कैलास थेटे, प्रसाद जोंधळे आदी उपस्थित होते.

दरम्यान, बदक यांची उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# बबुबाई शंकर पानसरे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील घुलेवाडी गावातील एकनाथ शंकर पानसरे यांच्या मातोश्री बबुबाई शंकर पानसरे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या १०२ व्या वर्षी निधन झाले. या परिसरातील जुन्या पिढीतल्या एकमेव साक्षीदार असलेल्या बबुबाई पानसरे यांच्या निधनामुळे घुलेवाडी व संगमनेर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी सकाळी घुलेवाडी येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले एकनाथ शंकर पानसरे, संपत शंकर पानसरे, भास्कर शंकर पानसरे, नातू विवेक एकनाथ पानसरे, डॉ. प्रविणकुमार एकनाथ पानसरे यांच्यासह सूना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार



आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. बबुबाई शंकर पानसरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# अतिक्रमण मोहिमेविरोधात शिवसेना (ठाकरे) आक्रमक

## निवेदनातून अन्यायकारक कारवाईचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने संगमनेर नगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत मुख्याधिकारी गोरे साहेब व नगराध्यक्षा सौ. मैथिलीताई तांबे यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, नगरपालिकेकडून राबविण्यात आलेली अतिक्रमण मोहीम एकतर्फी व अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नवीन नगर रोड परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आले असले तरी शहरातील इतर भागांमध्ये मात्र अतिक्रमण जैसे थे ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे.



या कारवाईमुळे स्थानिक दुकानदार, शेतकरी, भाजी विक्रेते, चहा टपरीधारक तसेच लघु व्यावसायिकांवर मोठा आर्थिक परिणाम झाला. अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे, पार्किंग सुविधा नसलेल्या मोठ्या व्यावसायिक आस्थापनांबाबत प्रशासन सौम्य भूमिका घेत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तसेच बाहेरील राज्यांतून आलेल्या फेरीवाल्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे नमूद करत, शहरातील विविध भागांमध्ये सायंकाळनंतर उघडपणे व्यवसाय करणाऱ्या पाणीपुरी, आईस्क्रीम, फालुदा, मोमोज, आमलेट-पाव आदी विक्रेत्यांमुळे वाहतूक व शिस्तीचा प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले आहे. काही ठिकाणी अशा व्यवसायांमध्ये बेकायदेशीर प्रकारांना प्रशासनाची मुकसंमती असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या आहेत. यात अतिक्रमण हटाव कारवाईमुळे बाधित व्यावसायिकांना तात्काळ पर्यायी व्यवस्था द्यावी. संपूर्ण संगमनेर शहरात समान व न्याय्य पद्धतीने अतिक्रमण कारवाई करावी. सर्व लघु व्यावसायिकांना नियोजित व कायमस्वरूपी व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. दरम्यान मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास स्थानिक नागरिकांसह नगरपालिकेच्या प्रांगणात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605
DEVISH ADVERTISER

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25